बुधवार दि. ०१ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३०० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

[illegible] हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालना तालुक्यातील रस्ते कामांमध्ये लाखो रुपयांच्या भ्रष्टाचाराचा आरोप; चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी

### २०२३ ते २०२५ या कालावधीतील पंचायत समितीअंतर्गत कामांची कागदपत्रे १५ दिवसांत द्या, अन्यथा ३५ ते ४० गावांतील नागरिकांसह आमरण उपोषणाचा इशारा

**जालना । प्रतिनिधी**

जालना तालुक्यात पंचायत समिती स्तरावर एप्रिल २०२३ ते मार्च २०२५ या कालावधीत शासनाच्या विविध योजनांतर्गत करण्यात आलेल्या गावांतर्गत रस्ते, जोडरस्ते, रस्ते मजबुतीकरण, मातीकाम, खडीकरण, पूल बांधकाम व दुरुस्तीच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप करत सामाजिक कार्यकर्ते शिवाजी (दादा) पा. शेजुळ यांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे सविस्तर तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधित ठेकेदारांचे परवाने रद्द करावेत तसेच संगनमताने गैरव्यवहार करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना निलंबित करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

तक्रार अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे सादर करण्यात आला असून त्याच्या प्रती कार्यकारी अभियंता (बांधकाम) तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मनरेगा) यांनाही देण्यात आल्या आहेत.

रस्त्यांची कामे न करताच बिले उचलल्याचा आरोप

तक्रारीत नमूद केल्यानुसार, जालना तालुक्यात विविध शासकीय योजना व उपकर निधीतून मंजूर करण्यात आलेल्या अनेक विकासकामांपैकी गावांतर्गत रस्ते, जोडरस्ते, रस्त्यांचे मजबुतीकरण, मातीकाम, खडीकरण, पूल बांधकाम व दुरुस्तीची अनेक कामे प्रत्यक्षात न करता संबंधित ठेकेदारांनी अधिकाऱ्यांच्या संगनमताने बिले काढून शासनाची फसवणूक केली. या प्रकारामुळे शासनाचा लाखो रुपयांचा निधी वाया गेला असून नागरिकांचीही दिशाभूल झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सर्व कागदपत्रे जाहीर करण्याची मागणी



शिवाजी शेजुळ यांनी या सर्व कामांची सखोल चौकशी करून प्रत्येक कामासंदर्भातील पुढील कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

प्रशासकीय मान्यता तांत्रिक मान्यता

कार्यारंभ आदेश काम पूर्णत्वाचा दाखला

गुणवत्ता प्रमाणपत्र अंतिम बिल व देयकांची माहिती

काम सुरू होण्यापूर्वीचे, काम सुरू असतानाचे आणि पूर्ण झाल्यानंतरचे जिओ-टॅग छायाचित्रे

या सर्व कागदपत्रांच्या आधारे प्रत्यक्ष काम झाले की केवळ कागदोपत्री दाखविण्यात आले, याची सत्यता समोर येईल, असा दावा त्यांनी केला आहे.

**दोषींवर निलंबनासह कठोर कारवाईची मागणी**

तक्रारीत केवळ चौकशीची मागणी न करता संबंधित ठेकेदारांचे शासकीय परवाने रद्द करण्यात यावेत तसेच गैरव्यवहारात सहभागी असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करून त्यांच्यावर शिस्तभंग व फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

**१५ दिवसांचा अल्टिमेटम**

जिल्हा परिषद प्रशासनाने तक्रारीत नमूद केलेल्या सर्व कामांची माहिती आणि साक्षांकित कागदपत्रे १५ दिवसांच्या आत उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी अर्जात करण्यात आली आहे. निर्धारित मुदतीत माहिती न दिल्यास ३५ ते ४० गावांतील नागरिकांना सोबत घेऊन जिल्हा परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

उपोषणादरम्यान कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी जिल्हा परिषद प्रशासनाची राहील, असेही तक्रारदारांनी स्पष्टपणे नमूद केले आहे.

**जिल्ह्यात खळबळ**

रस्ते विकासकामांमध्ये कथित भ्रष्टाचाराचे आरोप, मोठ्या प्रमाणावर शासकीय निधीचा गैरवापर झाल्याचा दावा आणि ३५ ते ४० गावांतील नागरिकांसह आमरण उपोषणाचा इशारा यामुळे जालना जिल्ह्यात या प्रकरणाची चर्चा सुरू झाली आहे. प्रशासन या तक्रारीची कोणत्या पद्धतीने दखल घेते आणि चौकशीचे आदेश देते का, याकडे नागरिकांसह राजकीय व सामाजिक वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## बाल गुन्हेगारी रोखण्यासाठी कायदे अधिक कडक करा; अल्पवयीनांचा वापर करणाऱ्या टोळ्यांवर संघटित गुन्हेगारी कायद्यांतर्गत कारवाईचा विचार

### *आमदार अर्जुनराव खोतकर यांची विधानसभेत ठाम मागणी; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कठोर कायदे आणि तातडीच्या उपाययोजनांचे आश्वासन*

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात वाढत्या बाल गुन्हेगारीच्या घटनांबाबत आज विधानसभेत गंभीर चर्चा झाली. ज्या वयात मुलांच्या हातात पाटी-पुस्तके असायला हवीत, त्या वयात काही अल्पवयीन मुलांच्या हातात चाकू, सुरे आणि इतर घातक शस्त्रे दिसत असल्याची खंत व्यक्त करत आमदार यांनी बाल गुन्हेगारी रोखण्यासाठी विद्यमान कायदे अधिक कठोर करण्याची आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जोरदार मागणी विधानसभेत केली.

या मागणीवर उत्तर देताना मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांनी सरकार या विषयाकडे अत्यंत गांभीर्याने पाहत असून आवश्यक त्या कायदेशीर सुधारणा आणि कठोर उपाययोजना तातडीने करण्यात येतील, असे स्पष्ट आश्वासन सभागृहाला दिले.

**वाढती बाल गुन्हेगारी चिंतेचा विषय**

लक्षवेधी सूचनेद्वारे प्रश्न उपस्थित करताना आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, राज्यात अल्पवयीन मुलांकडून गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडत असल्याच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. ही परिस्थिती समाजासाठी





अत्यंत धोकादायक असून भविष्यातील पिढी चुकीच्या मार्गावर जात असल्याचे चित्र दिसत आहे.

ते म्हणाले की, काही सराईत गुन्हेगार आणि गुन्हेगारी टोळ्या विद्यमान कायद्यांतील तरतुदींचा गैरफायदा घेत अल्पवयीन मुलांना पैशांचे आमिष, नशेचे व्यसन किंवा इतर प्रलोभने दाखवून चोरी, दरोडे, खून, हल्ले, मादक पदार्थांची तस्करी यांसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी करून घेत आहेत. अशा टोळ्यांवर कठोर कारवाई झाली नाही तर भविष्यात ही समस्या अधिक गंभीर होऊ शकते.

**पालक, समाज आणि प्रशासनाचीही जबाबदारी**

खोतकर यांनी केवळ कायदे कठोर करून चालणार नाही, तर पालक, शिक्षक, समाज आणि संबंधित शासकीय यंत्रणांनीही आपली जबाबदारी पार पाडणे आवश्यक असल्याचे सांगितले.

त्यांच्या मते, मुलांवर योग्य संस्कार, शिक्षण आणि सामाजिक मार्गदर्शनाचा अभाव निर्माण झाल्यास ते सहज गुन्हेगारी प्रवृत्तीच्या प्रभावाखाली जातात. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाने याबाबत सजग राहण्याची गरज आहे.

**समुपदेशन आणि पुनर्वसनावर भर**

सभागृहात बोलताना आमदार खोतकर यांनी गुन्ह्यांमध्ये अडकलेल्या अल्पवयीन मुलांना कायमचे गुन्हेगार म्हणून न पाहता त्यांचे योग्य समुपदेशन आणि पुनर्वसन करणे तितकेच महत्त्वाचे असल्याचे नमूद केले.

त्यांनी मानसोपचारतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि समुपदेशक यांच्या माध्यमातून अशा मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी स्वतंत्र पुनर्वसन व्यवस्था उभारण्याची मागणी केली. तसेच संबंधित पालक आणि कुटुंबीयांचे समूह समुपदेशन करून कुटुंबातील वातावरण सुधारण्यावरही भर देण्याची सूचना केली.

**विद्यमान कायद्याचा गैरफायदा घेत असल्याची मुख्यमंत्र्यांची कबुली**

उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, १८ वर्षांखालील विधीसंघर्षित बालकांवर विद्यमान कायद्यानुसार स्वतंत्र न्यायिक प्रक्रिया राबवावी लागते. अशा मुलांना नियमित कारागृहात न ठेवता बालसुधारगृहात ठेवण्याची तरतूद आहे.

याच तरतुदींचा गैरफायदा घेत काही गुन्हेगारी टोळ्या अल्पवयीन मुलांचा वापर गंभीर

## आ. बबनराव लोणीकर यांच्या दणक्याने रोजगार हमी आयुक्तांची उचलबांगडी

### मुख्यमंत्री व महसूल मंत्र्यांकडे तक्रार केल्यानंतर तडकाफडकी नागपूरहून लातूरला बदली!

**जालना - प्रतिनिधी**

मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार बबनराव लोणीकर यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून रोजगार हमी योजनेतील कथित भ्रष्टाचाराचा मुद्दा जोरदारपणे उपस्थित केला होता. विशेषतः रोजगार हमी योजनेचे तत्कालीन आयुक्त यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर आक्षेप घेत निधी वितरणातील अनियमितता आणि भ्रष्टाचाराच्या तक्रारी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. त्यासंदर्भात आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांना तक्रार दिली होती. संबंधित तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सरकारने या अधिकाऱ्यावर तातडीने कारवाई करून त्यांची बदली करून विधानसभेत दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी केली. संबंधित आयुक्तांची नागपूर येथून उचलबांगडी करून लातूर येथे बदली करण्यात आली. मात्र केवळ बदली करून प्रश्न संपणार नाही, तर निधी वितरणातील कथित गैरव्यवहारांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी पुन्हा एकदा विधानसभेत ठामपणे केली.

शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी वर्गाच्या न्याय्य हक्कासाठी आमदार बबनराव लोणीकर यांनी विधानसभेत आक्रमक भूमिका घेत सरकारला थेट जाब विचारला. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकऱ्यांच्या हिताचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याचे स्वागत करत, या निर्णयामुळे मागील ५० वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळण्याची आशा निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. मात्र हा निर्णय केवळ कागदावर न राहता जालना जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील रस्त्यांच्या कामांसाठी तातडीने निधी उपलब्ध करून प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात यावी, अशी ठाम मागणी त्यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे सभागृहात केली. ग्रामीण भागाचा विकास आणि शेतकऱ्यांचा विश्वास टिकवायचा असेल तर शासनाने तातडीने कृती करावी, असा इशाराही आमदार बबनराव लोणीकर यांनी दिला.

यावेळी आमदार लोणीकर यांनी रोजगार हमी योजनेअंतर्गत पूर्ण झालेल्या सिंचन विहिरी, पांदन रस्ते, गोठे आणि इतर विकासकामांचे पैसे अद्याप लाभार्थ्यांना मिळाले नसल्याचा गंभीर मुद्दा उपस्थित केला. कामे पूर्ण करूनही निधी न मिळाल्याने शेतकरी, ग्रामस्थ आणि कंत्राटदार आर्थिक संकटात सापडल्याचे देखील आमदार लोणीकर यांनी सांगितले. शासनाच्या आश्वासनांवर विश्वास ठेवून कामे पूर्ण करणाऱ्यांना निधीसाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत असल्याची खंत

## रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी प्रशांत महाजन तर सचिवपदी संदीप मुंदडा



प्रशांत महाजन संदीप मुंदडा

**जालना - प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ जालनाची सन २०२६-२०२७ साठी नूतन कार्यकारणी निवडण्यात आली असून, अध्यक्षपदी प्रशांत महाजन, सचिवपदी संदीप मुंदडा तर कोषाध्यक्षपदी बिजल भायानी यांची निवड करण्यात आली आहे.

नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण पदग्रहण सोहळा गुरुवार दि. ९ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत हॉटेल्स सॅफ्रनमध्ये आयोजित करण्यात आला आहे. यावेळी रोटरी परिवारातील पदाधिकारी आणि सदस्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रोटरी क्लब ऑफ जालनाच्या मावळत्या अध्यक्ष सौ. वर्षा पित्ती आणि मावळते सचिव लक्ष्मीनिवास मल्लावत यांनी केले आहे.

## टीईटी पेपर फुटी प्रकरणी शालेय शिक्षण मंत्री यांचा राजीनामा व परीक्षा परीषद प्रमुखावर कार्यवाही करावी

### मराठवाडा शिक्षक संघाची राज्याचे मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

**दत्ता देशमुख**

टीईटी पेपरफुटी प्रकरणी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद प्रमुखांवर निलंबनाची कारवाई करावी व राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांचा राजीनामा घेण्यात यावा असी मागणी मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने संघटनेचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आसल्याची माहिती शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

या विषयी अघाव यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, शिक्षक पदवी आणि पदविका धारण केलेल्या भावी शिक्षकांना आरटीई नुसार टीईटी परीक्षा उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे. त्यानुसार लाखो भावी शिक्षक या परीक्षेची तयारी करतात. मा.सर्वोच्च न्यायालयाने पाच वर्षे सेवा राहिलेल्या शिक्षकांचा अपवाद करून सर्व कार्यरत शिक्षकांना टीईटी बंधनकारक केली आहे. त्यामुळे लाखो शिक्षक या परीक्षेच्या कक्षेत आले आहेत. भावी व कार्यरत शिक्षकांनी २८ जूनच्या परीक्षेची जोरदार तयारी केली होती परंतु,आदल्या दिवशीच टीईटीचा पेपर फुटल्याचे निष्पन्न झाले आणि परीक्षा रद्द करण्यात आली.

देशात व राज्यात पेपरफुटीचा रोग लागला आहे त्याचे कारण जबाबदारी आणि कारवाई नाही.शासन कर्त्यांचा प्रशासकीय यंत्रणेवर वचक व धाक राहिला नसल्यामुळे यंत्रणा मस्तवाल झाल्या आहेत, बेफिकीर झाल्या आहेत. आमचे कुणीही काही करू शकत नाही,या अविर्भावात वावरत आहेत. टीईटी पेपरफुटीला महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद आणि राज्याचा शालेय शिक्षण विभाग जबाबदार आहे.त्यांच्या या बेफिकिरी मुळे त्यांच्या विरोधात भावी व कार्यरत शिक्षकांमधे तीव्र असंतोष व चिड निर्माण झालेली आहे. याची उचित दखल घेऊन परीक्षा परिषद प्रमुखांवर निलंबनासारखी कडक कारवाई करण्यात यावी आणि राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांचा राजीनामा घेण्यात यावा. अशा कडक कारवाईने धाक आणि जबाबदारीचे भान निर्माण होईल. व अशा अप्रिय घटना भविष्यात घडणार नाहीत असे दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

प्रसिद्धी पत्रकावर संघटनेचे मार्गदर्शक पी.एस.घाडगे,व्ही.जी.पवार अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम,ए.बी.औताडे, ज्ञानोबा वरवट्टे, गुठे एस.जी.,पवार टी.जी.माळी एन.जी.,रेखा सोळुंके, अशोक मस्कले, बंडू अघाव, मधुकर जोंधळे, रातोळे जी.जी.,कुरेशी ए.एन.,राठोड पी.आर.,सुर्यवंशी आर.एन.,कदम व्ही.जी.,कौशल्य जी.पी.,पाटोदेकर ए.डी,सोळंके एन.टी.,वऱ्हाड बी.ए.,तिर्थकर एस.एस.,जमादार एफ.जी.,पाटील पी.एस.कालीदास धपाटे, व्यंकट चिलवरवार,बसवेश्वर स्वामी, शेरखाने जे.एस.,रमेश आंधळे, यशवंत मकरंद, हरिभाऊ भडके,हाळदे के.एम.गणेश आजबे,भाई चंद्रकांत चव्हाण, रविंद्र वाकोडे, जी.व्ही.माने,विक्रम मायाचारी,संजय यळवंते,जगन वाघमोडे, कदम एन.टी.,ढेंगळे व्ही.एस. आदिंची नावे आहेत.

# संपादकीय....

## ‘टक्केवारी’च्या व्हिडीओने खळबळ

कोल्हापुरातील शिवसेना आमदार राजेश क्षीरसागर यांच्याशी संबंधित कथित ‘टक्केवारी’ प्रकरणाची चर्चा राज्यभर रंगली आहे. या प्रकरणामुळे सार्वजनिक कामांमधील पारदर्शकता, लोकप्रतिनिधींची जबाबदारी आणि भ्रष्टाचारावरील नियंत्रण याविषयी पुन्हा प्रश्न उपस्थित झाले आहेत. एकीकडे आमदार क्षीरसागर यांनी हे फेटाळत एआयच्या मदतीने विरोधकांनी कुंभाड रचल्याचे म्हटले आहे, तर दुसरीकडे विरोधकांनी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली असून, संबंधितांकडूनही आपली बाजू मांडली जात आहे. आरोप आणि प्रत्यारोपांच्या पार्श्वभूमीवर सत्य समोर येण्यासाठी सखोल व निष्पक्ष तपास आवश्यक आहे. कोणत्याही निष्कर्षापूर्वी अधिकृत चौकशी आणि पुराव्यांच्या आधारेच निर्णय होणे, हे लोकशाही आणि न्यायव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

दक्षिण महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या सर्वाधिक चर्चा होत असलेला विषय म्हणजे शिवसेना शिंदे गटाचे आमदार राजेश क्षीरसागर यांच्याशी संबंधित कथित ‘टक्केवारी’ मागितल्याचा व्हिडीओ. काही मिनिटांच्या या व्हिडीओने कोल्हापूरच्या राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडवली आहे. महापालिका निवडणुकीच्या तोंडावर समोर आलेल्या या प्रकरणामुळे सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांचे नवे रणांगण तयार झाले आहे. या प्रकरणाला सर्वप्रथम राजकीय स्वरूप देण्याचे काम ठाकरे गटाचे नेते रविकिरण इंगवले यांनी केले. त्यांनी हा व्हिडीओ सार्वजनिक करत विकासकामांमध्ये टक्केवारी मागितल्याचा गंभीर आरोप केला. त्यानंतर काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. ‘व्हिडीओ खरा की खोटा, याचा निर्णय तपासातूनच होईल; पण जनतेसमोर आलेल्या गंभीर आरोपांची सरकारने दखल घेतलीच पाहिजे,’ अशी त्यांची भूमिका होती. त्यांनी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून सत्य बाहेर आणण्याची मागणी केली. सतेज पाटील यांनी यानंतरही वेळोवेळी या विषयावर भूमिका घेत सरकारवर निशाणा साधला. एवढ्या गंभीर स्वरूपाचे आरोप समोर आल्यानंतर केवळ स्पष्टीकरण देऊन भागणार नाही, तर स्वतंत्र आणि विश्वासार्ह चौकशी झाली पाहिजे, असे ते सातत्याने सांगत आहेत. विकासकामांमध्ये टक्केवारीचे आरोप केवळ एका व्यक्तीपुरते मर्यादित नसून संपूर्ण प्रशासनाच्या विश्वासार्हतेशी संबंधित असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. दुसरीकडे, आमदार राजेश क्षीरसागर यांनी सर्व आरोप स्पष्ट शब्दांत फेटाळून लावले आहेत. संबंधित व्हिडीओ कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) साहाय्याने तयार केलेला किंवा संपादित केलेला असल्याचा दावा त्यांनी केला आहे. आपली राजकीय प्रतिमा मलिन करण्यासाठी हा कट रचण्यात आल्याचा आरोप करत त्यांनी संबंधितांविरोधात पाच कोटी रुपयांच्या अब्रुनुकसानीचा दावा दाखल करण्याचा इशारा दिला आहे. या वादात आणखी एक महत्त्वाची भर पडली ती आमदारांचे पुत्र ऋतुराज क्षीरसागर यांच्या प्रतिक्रियेमुळे. त्यांनी थेट काँग्रेसचे आमदार सतेज पाटील या व्हिडीओच्या प्रसारामागे असल्याचा आरोप केला. हा व्हिडीओ यापूर्वीही निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर व्हायरल करण्यात आला होता आणि आता पुन्हा त्याच पद्धतीने राजकीय हेतूने वापरला जात असल्याचा दावा त्यांनी केला. मात्र, या आरोपांवर सतेज पाटील यांनी चौकशीची मागणी कायम ठेवत, ‘सत्य बाहेर येऊ द्या,’ एवढीच भूमिका घेतली आहे. या संपूर्ण प्रकरणात अद्याप कोणत्याही सरकारी तपास यंत्रणेने व्हिडीओ अस्सल असल्याचे किंवा बनावट असल्याचे अधिकृतपणे घोषित केलेले नाही. त्यामुळे सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या कोणत्याही सामग्रीला अंतिम सत्य मानणे योग्य ठरणार नाही. आजच्या डिजिटल युगात डीपफेक, एडिटिंग आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून दिशाभूल करणारे व्हिडीओ तयार होऊ शकतात, हेही तितकेच वास्तव आहे. तरीही या घटनेने एक गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. विकासकामांमध्ये टक्केवारी ही केवळ विरोधकांची राजकीय टीका आहे की प्रत्यक्षात अशी यंत्रणा अस्तित्वात आहे? हा प्रश्न केवळ कोल्हापूरपुरता मर्यादित नाही; तो राज्याच्या राजकारणाशी आणि जनतेच्या विश्वासाशी निगडित आहे. त्यामुळे या प्रकरणाचा निष्पक्ष तपास होणे अत्यंत आवश्यक आहे. कोल्हापूरचे राजकारण सहकार, स्थानिक स्वराज्य संस्था आणि वैयक्तिक राजकीय प्रभाव यांभोवती फिरत आले आहे. अशा पार्श्वभूमीवर या व्हिडीओने केवळ एका आमदारालाच नव्हे, तर सत्ताधारी महायुतीच्या प्रतिमेलाही धक्का दिला आहे. विरोधक या मुद्द्यावर आक्रमक झाले आहेत, तर सत्ताधारी हा राजकीय कट असल्याचा दावा करत आहेत. या प्रकरणाचा अंतिम निकाल तपास आणि न्यायप्रक्रियेनंतरच स्पष्ट होईल. तोपर्यंत आरोप करणाऱ्यांनी पुरावे सादर करणे आणि आरोप नाकारणाऱ्यांनी चौकशीला पूर्ण सहकार्य करणे, हेच लोकशाहीचे संकेत आहेत. कारण राजकारणात आरोप करणे सोपे असते; पण सत्य टिकवण्यासाठी पारदर्शक तपास आणि न्यायनिष्ठ प्रक्रिया यांनाच सर्वाधिक महत्त्व असते. कोल्हापूरच्या या वादाने पुन्हा एकदा हेच अधोरेखित केले आहे.

# कुठे नेऊन ठेवला महाराष्ट्र माझा! ‘नीट’ नंतर ‘टीईटी’ पेपर लिक हे राज्यासह देशात चाल्लय तरी काय!

राज्यासह देशात महागाई, बेरोजगारी, कुपोषण,भुकमरी शेतकऱ्यांच्या आत्महत्या, विद्यार्थ्यांच्या आत्महत्या एवढ्या मोठ्या गंभीर व जटील समस्या देशापुढे व राज्यापुढे उभ्या ठाकल्या आहे आणि जेथुन मनुष्य लहानाचा मोठा होतो अशा शिक्षण क्षेत्राचा सरकारने तमाशा करून ठेवला आहे.काही दिवसाअगोर जेथून डॉक्टर्स निर्माण होतात आणि जी मनुष्यासाठी दैवी शक्ती मानल्या जाते अशा दैवी शक्तीवर नीट पेपर फुटीने घनाघाती प्रहार केला आणि आरोग्य क्षेत्राची संपूर्ण देशभर नाचक्की झाली आणि आता दिनांक २८ जूनला ज्यामाध्यातून शिक्षक (टीचर, गुरूजी) निर्माण होतात अशा ‘‘गुरू‘‘ (शिक्षण क्षेत्रातील वटवृक्ष) या शब्दाची ‘‘टीईटी‘‘ पेपर फुटीने शिक्षण क्षेत्राची खुली विटंबना करून हत्याच केल्याचे दिसून येते.शिक्षण क्षेत्राप्रमाणे प्रत्येक धर्माची देवावर आस्था असतेच असे हिंदूचे प्रतिष्ठित,जागतिक स्तरावर नामांकित हिंदूंचे श्रद्धेचे स्थान अयोध्येतील राममंदिर आहे.या मंदिरातील देणगीवर रामजन्मभूमी ट्रस्टच्या विश्वस्तांनी, तेथील कर्मचाऱ्यांनी आणि त्यांच्या मंडळींनी डाका टाकला व दोन हजार कोटींपेक्षा जास्त पैसा व सोने-चांदी,आभूषणे लंपास केल्याचा अंदाज आहे.कारण २०२० ला ट्रस्ट स्थापन झाले होते तेव्हा पासून हा चोरीचा धंदा सुरू असावा असे मला वाटते.या प्रकरणाने देशाची १४० कोटी जनता स्तब्ध झाली आहे.म्हणजे ज्या आस्थेने आपण मंदिरात पैसा देतो तीथेच खुलेआम डाका पडतो ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. म्हणजे एकीकडे शिक्षण क्षेत्राचा तमाशा आणि दुसरीकडे आस्थेच्या नावावर मंदिरातील खेळ खंडोबा या घृणास्पद आणि धक्कादायक घटनांमुळे राज्यासह देशातील प्रत्येक व्यक्तींची मने दुखावली आहेत.हा सर्व प्रकार एकाच महिन्यात म्हणजे जून महिन्यात दिसून आला.सरकारने जनूकाय शिक्षणाचा व आस्थेचा तमाशा मांडला की काय असे चित्र देशासह महाराष्ट्रात दिसून येते.नीट पेपर लिक प्रकरणांमध्ये महाराष्ट्रातूनच सुरूवात झाली आणि नीट पेपर लिक प्रकरणातील अनेक दिग्गज महाराष्ट्रातुन पकडल्या गेले यात पुण्यातील जीवशास्त्राची वरिष्ठ प्राध्यापिका मनीषा गुरूनाथ मांढरे,प्रा.पी.व्ही.कुलकर्णी, मनीषा वाघमारे, आणि‘‘बोगस डॉक्टर घडवणाऱ्या फॅक्टरीचा‘‘अर्थात आयसीसीचा संचालक शिवराज मोटेगावकर यांनी शिक्षण क्षेत्राला काळीमा फासून महाराष्ट्राला देशात बदनाम करण्याचे काम केले आणि आता दिनांक २८ जूनला २०२६ ला होणाऱ्या महाराष्ट्र शिक्षण पात्रता परीक्षेची (महाटीईटी) प्रश्नपत्रिका फुटल्याचा प्रकार समोर आला आहे.यावरून स्पष्ट होते की, महाराष्ट्रात बोगस शिक्षण प्रणालीला चालना देणारे मोठ-मोठे मासे आपल्या राज्यात घर करून आहे व शिक्षण प्रणालीला कलंकित करीत आहे.ही बाब नीट पेपर लिक,नंतर टीईटी पेपर लिक प्रकरणावरून सिध्द होते.जनुकाय देशासह राज्यात शिक्षणाचा बाजार मांडला की काय असे चित्र दिसत आहे.नीट पेपर लिक प्रकरणात शिक्षण विभागाने २५ लाख विद्यार्थ्यांच्या भावनेशी खेळखंडोबा केला काही विद्यार्थ्यांना पेपर लिक प्रकार पेलले नाही व मनस्ताप अनावर झाला अशा परिस्थिती देशातील २० ते २५ विद्यार्थ्यांनी आत्महत्या सुध्दा केल्या अशी भयावह घटना नीट पेपर लिक प्रकरण घडली.नीट पेपर लिक प्रकरणाला काही दिवसच होत नाही तर शिक्षणक्षेत्राला काळीमा फासणारी घटना आणि कलंकित करणारी घटना महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) लीक प्रकरणात दिसून आली यामुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरला. ‘‘टीईटी‘‘ प्रश्नपत्रिका दीड कोटी रुपयांना विकण्यासाठी दिल्लीहून आलेल्या तीन जणांना पोलीस पथकाने मुंबई- नाशिक महामार्गावरील ओवळी डोंगराळी गाव परिसरात सापळा रचून आरोपींना अटक केली यात धीरज बलराज सिंग हरयाणा, राजीव शाव बिहार, आणि आकाश कुमार सरोज कुमार अशी अटकेची तीन आरोपींची नावे आहेत.हे आरोपी जरी हरयाणा व बिहारचे असले तरी टीईटी पेपर लिकचे मुख्य सुत्रधार महाराष्ट्रातीलच राहु शकते.कारण नीट पेपर लिक प्रकरणात महाराष्ट्रातील दिग्गज अग्रेसर होते.

त्याचप्रमाणे टीईटी पेपर लिकमध्ये महाराष्ट्रातील अनेक दिग्गज व राजकीय पुढारी सामिल राहू शकतात यालाही नाकारता येत नाही.नीट पेपर लिक प्रकरण मोठ्या प्रमाणात गाजले यात २० ते २५ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या एवढे होऊनही नीट पेपर लिकची जबाबदारी सरकार स्विकारण्यास तयार नाही आणि आता महाराष्ट्रात झालेल्या ‘‘टीईटी‘‘पेपर लिक प्रकरणात सुध्दा सरकार जबाबदारी स्वीकारणार नाही.फक्त एसआयटी चौकशीची भाषा होईल आणि होत आहे. शेवटी खोदा पहाड निकला चुहा अशीच परिस्थिती होईल असे चित्र दिसत आहे.महाराष्ट्रात नुकत्याच (२८ जून २०२६) आयोजित करण्यात



आलेल्या महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेसाठी (महाटीईटी) एकूण ६ लाख १२८ उमेदवार होते.सोबतच सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सेवेत असलेल्या शिक्षकांनाही टीईटी उत्तीर्ण होणे बंधनकारक झाल्यामुळे यंदा परीक्षार्थींच्या संख्येत विक्रमी वाढ झाली होती.परंतु टीईटी पेपर फुटल्याने संपूर्ण महाराष्ट्रात गोंधळ झाला आणि परीक्षा पुढे ढकलण्याचे संकेत आले.अशाप्रकारे सरकारच्या चुकांमुळे ६ लाख १२८ उमेदवारांना सरकारने चिंतेत टाकले आहे.अशा घटना पुन्हा-पुन्हा होणार नाही याची दक्षता केंद्र व राज्य सरकारने घ्यावी व पेपर लिक प्रकरणात जे कोणी सहभागी असेल त्या सर्वांवर कठोर कारवाई करण्यात यावी.जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

पान १ व ४ वरुन...

### बाल गुन्हेगारी...

गुन्ह्यांसाठी करत असल्याचे अनेक प्रकरणांत दिसून आले आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून सरकार याबाबत संवेदनशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**कायद्यात दुरुस्तीचा निर्णय**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, अल्पवयीन मुलांना गुन्हे करण्यास प्रवृत्त करणाऱ्या, त्यांचा वापर करणाऱ्या किंवा त्यांना गुन्हेगारीकडे ढकलणाऱ्या व्यक्तींवर अधिक कठोर कारवाई करण्यासाठी विद्यमान कायद्यात आवश्यक सुधारणा करण्याचा सरकारचा विचार आहे.

अशा व्यक्तींना होणाऱ्या शिक्षेत वाढ करण्याबाबत सरकार सकारात्मक असून यासाठी आवश्यक ती कायदेशीर दुरुस्ती करण्यात येईल, असे त्यांनी जाहीर केले.

संघटित गुन्हेगारी कायद्यांतर्गत कारवाईचाही विचार

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, जर अल्पवयीन मुलांचा वापर संघटित गुन्हेगारी टोळ्यांकडून केला जात असल्याचे आढळले, तर अशा टोळ्यांवर संघटित गुन्हेगारीविरोधी कायद्यांतर्गत कठोर कारवाई करता यावी, यासाठीही कायदेशीर तरतूद करण्यात येईल.

यामुळे बालकांचा वापर करून गुन्हे करणाऱ्या टोळ्यांवर अधिक प्रभावीपणे अंकुश ठेवता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**सर्वंकष धोरणाची गरज**

सभागृहातील चर्चेदरम्यान बाल गुन्हेगारी रोखण्यासाठी केवळ पोलिस कारवाई पुरेशी नसून शिक्षण, संस्कार, क्रीडा, कौशल्य विकास, मानसिक आरोग्य, समुपदेशन आणि सामाजिक पुनर्वसन या सर्व बाबींचा समावेश असलेले व्यापक धोरण आवश्यक असल्याचे मतही व्यक्त करण्यात आले.

**सामाजिक आणि राजकीय वर्तुळात स्वागत**

आमदार अर्जुनराव खोतकर यांनी उपस्थित केलेल्या या मुद्द्यामुळे राज्यातील वाढत्या बाल गुन्हेगारीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अल्पवयीन मुलांचा गुन्हेगारीसाठी वापर करणाऱ्या टोळ्यांवर कठोर कारवाईचा मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मुख्यमंत्र्यांनी कायद्यात सुधारणा करण्याबाबत सकारात्मक भूमिका घेतल्याने बाल गुन्हेगारी रोखण्यासाठी अधिक सक्षम आणि प्रभावी कायदेशीर यंत्रणा उभी राहील, अशी अपेक्षा सामाजिक तसेच राजकीय वर्तुळातून व्यक्त होत आहे. तसेच, प्रतिबंध, समुपदेशन आणि पुनर्वसन या त्रिसूत्रीच्या माध्यमातून बालकांना गुन्हेगारीच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी शासनाने लवकरच ठोस पावले उचलावीत, अशी मागणीही जोर धरू लागली आहे.

### आ. बबनराव लोणीकर...

त्यांनी व्यक्त केली. विकासकामांचा वेग निधीअभावी थांबणे ही शासनाच्या कारभारातील गंभीर त्रुटी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचा निधी तात्काळ देण्याची मागणी यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली.

रोजगार हमी योजनेतील निधी वितरणात मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप करत आमदार लोणीकर यांनी संबंधित प्रशासनावरही निशाणा साधला. जिल्हाधिकाऱ्यांनी पाठवलेल्या शिफारशी डावलून टक्केवारीच्या आधारे निधी वाटप करण्यात आल्याचा आरोप त्यांनी सभागृहात केला. अशा प्रकारामुळे प्रामाणिक लाभार्थ्यांवर अन्याय होत असून भ्रष्ट पद्धतीला खतपाणी घातले जात असल्याचे त्यांनी सांगितले. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी आमदार लोणीकर यांनी केली. शासनाच्या योजनांमध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व राखणे ही सरकारची जबाबदारी असल्याचेही आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले.

अर्थसंकल्पीय अधिवेशनातही याच विषयावर तारांकित प्रश्न आणि लक्षवेधी सूचना मांडल्याची आठवण करून देत आमदार लोणीकर यांनी सरकारचे लक्ष वेधले. वारंवार प्रश्न उपस्थित करूनही अद्याप ठोस निर्णय होत नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांना केवळ आश्वासने नकोत, तर प्रत्यक्ष निधी आणि विकास हवा आहे, असे त्यांनी ठणकावून सांगितले. शासनाने प्रलंबित कामांसाठी निधी मंजूर करून ग्रामीण विकासाला गती द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. शेतकरी आणि कष्टकरी वर्गाच्या प्रश्नांवर आपण सातत्याने लढत राहणार असल्याचा निर्धारही अमर बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला.

रोजगार हमी योजनेअंतर्गत काम करणाऱ्या मजुरांचे प्रलंबित वेतन हा अत्यंत गंभीर प्रश्न असल्याचे सांगत आमदार लोणीकर यांनी केंद्र सरकारचा निधी येण्याची वाट पाहत मजुरांना उपाशी ठेवणे अमानवी असल्याचे स्पष्ट केले. केंद्राचा निधी उपलब्ध होईपर्यंत राज्य सरकारने आपल्या अखत्यारीतील निधीतून तात्काळ रक्कम वर्ग करून मजुरांचे थकीत वेतन अदा करावे, अशी जोरदार मागणी केली. घाम गाळून काम करणाऱ्या मजुरांना त्यांच्या श्रमाचा मोबदला वेळेवर मिळणे हा त्यांचा हक्क असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. गरीब आणि कष्टकरी वर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, असा आग्रह आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी धरला. शेतकऱ्यांचे प्रश्न, ग्रामीण विकासकामांचा निधी, रोजगार हमी योजनेतील प्रलंबित देयके आणि प्रशासनातील कथित अनियमितता या सर्व मुद्द्यांवर आमदार बबनराव लोणीकर यांनी विधानसभेत अत्यंत आक्रमक आणि अभ्यासपूर्ण भूमिका मांडली. शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी वर्गाच्या हक्कासाठी सरकारने तातडीने निर्णय घ्यावेत, अन्यथा हा लढा अधिक तीव्र केला जाईल, असा स्पष्ट इशारा आमदार बबनराव लोणीकर यांनी दिला. ग्रामीण भागातील प्रत्येक प्रलंबित काम पूर्ण होऊन प्रत्येक पात्र लाभार्थ्याला हक्काचा निधी मिळेपर्यंत आपण संघर्ष सुरूच ठेवणार असल्याचे तलोणीकर यांनी ठामपणे सांगितले. आमदार बबनराव लोणीकर यांच्या आक्रमक मांडणीमुळे शेतकरी आणि कष्टकरी वर्गाच्या प्रश्नांना विधानसभेत प्रभावीपणे वाचा फुटली.

### गोमाता संवाद...

शेखर मुंदडा यांनी गौआधारित प्राकृतिक शेती निर्माण करावी, गौशाळांना आत्मनिर्भर करून सीएसआर आणि दानशूरांसोबत जोडण्यासाठी काढलेल्या गौसंवाद यात्रेची भूमिका स्पष्ट करत गोसेवकांवरील झालेल्या केसेस संदर्भात वकिलांची टीम उभी करणार असल्याचे सांगितले. खाटकांना गाई विकू नका आपल्याला कळवा, प्रत्येक जिल्ह्यात गाय विकत घेण्यासाठी दानशूरांच्या मदतीने गोशाळांना गाई दिल्या जातील. असे सांगितले दि. २१ मे पासून आतापर्यंत गौ तस्करीचे २०० गुन्हे दाखल झाले असून ४३ जणांना तडीपार करण्यात आल्याचे सांगून गोशाळांना सीएसआर मधून सोलार देण्याचा मनोदय मुंदडा यांनी व्यक्त केला.

खा.डॉ.कल्याण काळे यांनी शेतकरी खरा गोपालक असून शेतकऱ्यांना गोपालन परवडेल यासाठी दुधाचे दर वाढवावे, गाईची दूध देण्याची क्षमता कशी वाढेल, दुष्काळात चाऱ्याची सबसिडी, अनुदान मिळावे यासाठी प्रयत्न करावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

भास्करराव अंबेकर यावेळी म्हणाले, पूर्वीच्या काळी ऋषीमुनी हे संशोधक आणि शास्त्रज्ञ होते . श्रीमंतीचे मोजमाप हे गोधनावर व्हायचे, सध्या ब्राझील नंतर भारतात दीड कोटी गोवंश असून प्रत्येक घरात आईप्रमाणे गाईवर प्रेम करावं असे सांगून गोपालक दूध काढतात आणि रस्त्यावर सोडून देतात याबद्दल अंबेकर यांनी संताप व्यक्त केला.

महापौर वंदनाताई मगरे यांनी भारतीय संस्कृतीची शान असलेल्या गोमाता संवाद यात्रेस शुभेच्छा दिल्या.

उपायुक्त डॉ. प्रशांत चौधरी यांनी पशुसंवर्धन कार्यालयामार्फत योजनांची अंमलबजावणी केली जात असून लसीकरण ,मार्गदर्शन शिबिरे घेतली जात आहेत. गोशाळांना मागणीप्रमाणे मोफत बियाणे व चाऱा वाटप केल्या जाईल असे सांगितले. उद्धव नेरकर यांनी अन्नयुक्त, ऊर्जा युक्त, कर्जमुक्त, प्रदूषण ,अपराध, कुपोषण आणि विषमुक्त भारतासाठी देशी गोवंशाचे संवर्धनाची आवश्यकता विषद केली.

प्रास्ताविकात डॉ.सुनील सुर्यवंशी यांनी गोसेवा आयोगाची स्थापना ऑनलाईन पारदर्शक पद्धतीने सुरू असलेल्या कामकाजाबाबत माहिती दिली. सूत्रसंचालन प्रेमलता लोया यांनी केले तर विजय कामड यांनी आभार मानले. यावेळी १९ गोशाळांचे अध्यक्ष ,विश्वस्त, संचालक , विश्व हिंदू परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ,बजरंग दलाचे पदाधिकारी, गौसेवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### फर्स्ट क्राइला ग्राहक...

आणि सादर केलेल्या पुराव्यांची तपासणी केल्यानंतर कंपनीचा युक्तिवाद फेटाळून लावला. आयोगाला असे आढळून आले की, कंपनी आपल्या आरोपांच्या समर्थनार्थ कोणताही ठोस पुरावा सादर करू शकली नाही. जुन्या व्यवहारात रिटर्न स्वीकारून परतावा दिल्यानंतर, नंतर त्याच व्यवहारावर फसवणुकीचा आरोप करणे हे कंपनीच्या स्वतःच्या धोरणांच्या विरोधात आहे, असे आयोगाने नमूद केले. तसेच, ग्राहकाला कोणतीही प्रक्रिया न अवलंबता फसवणूक करणारा ठरवणे हे सेवेतील त्रुटी आणि अनुचित व्यापार पद्धतीचे स्पष्ट उदाहरण आहे, ज्यामुळे ग्राहकाला मानसिक त्रास झाला.या प्रकरणी, जिल्हा ग्राहक आयोगाने फर्स्ट क्राइ.कॉम ला तक्रारदाराला २,१३० रुपये १ डिसेंबर २०२४ पासून ९% व्याजासह परत करण्याचे आदेश दिले. याशिवाय, मानसिक त्रासापोटी ५०,००० रुपये आणि कायदेशीर खर्चासाठी ५,००० रुपये भरपाई म्हणून देण्याचे निर्देश दिले आहेत. आयोगाने कंपनीला भविष्यात अशा अनुचित व्यापार पद्धतींपासून दूर राहण्याची ताकीद दिली असून, आदेशाची अंमलबजावणी ४५ दिवसांच्या आत करण्याचे निर्देश दिले आहेत.ॲड. महेश एस. धन्नावत यांचे विधान:‘‘कर्नुल ग्राहक आयोगाचा हा निर्णय ऑनलाइन खरेदी करणाऱ्या ग्राहकांसाठी एक मोठा दिलासा आहे. ई-कॉमर्स कंपन्या ग्राहकांना गृहीत धरू शकत नाहीत आणि आपल्या मनमानी धोरणांच्या आधारे त्यांना आर्थिक आणि मानसिक त्रास देऊ शकत नाहीत, हे या निकालाने पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. कोणताही ठोस पुरावा नसताना ग्राहकाला फसवणूक करणारा ठरवणे हे केवळ बेकायदेशीरच नाही, तर ग्राहकाच्या प्रतिष्ठेवर केलेला हल्ला आहे. हा निर्णय सर्व ई-कॉमर्स कंपन्यांसाठी एक चेतावणी आहे की त्यांनी पारदर्शक आणि कायद्याचे पालन करणारे व्यवहार करावेत, अन्यथा त्यांना कायद्याच्या कचाट्यात सापडावे लागेल.‘‘

### डिजिटल इंडिया...

घटनादत्त अधिकार अबाधित राहील याची खात्री करावी. नागरिकाला माहिती नाकारणे आणि पाण्यासारख्या मूलभूत विषयावर न्याय मागण्यापासून रोखणे, हे दोन्ही लोकशाहीला मारक आहे. ॲड. धन्नावत पुढे म्हणाले की, सरकारने डेटा सेंटर धोरणाचा फेरआढावा घेऊन तज्ज्ञ, पर्यावरणवादी, वकील संघटना व नागरिक प्रतिनिधींशी चर्चा करावी. विकास आणि पर्यावरणाचा समतोल साधला नाही तर तात्पुरता आर्थिक फायदा होईल, पण दीर्घकालीन नुकसान अटळ आहे. ‘आम्हाला विकास हवा आहे, पण तो शाश्वत हवा. पाणी आणि वीज या मूलभूत गरजा डावलून केलेला विकास टिकणारा नसतो,’ असे मत त्यांनी व्यक्त केले.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या अर्ज तपासणीस ३१ जुलै पर्यंत मुदतवाढ

**जालना - प्रतिनिधी**

शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतु शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या/शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या तसेच निवास, भोजन व अन्य सुविधांअभावी पुढील शिक्षण घेऊ शकत नसलेल्या अनु. जाती व नवबौध्द प्रवर्गातील विदयार्थ्यांपैकी ११ वी, १२ वी तसेच १२ वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये विविध स्तरावरील महाविद्यालयात / शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या विदयार्थ्यांना शासकीय वसतिगृहातील मुलां/मुलींप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणीक साहित्य व इतर आवश्यक सुविधा स्वतः उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बैंक खात्यामध्ये थेट जमा करण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२६ पासून सदर योजनेचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने ://../ या संकेतस्थळावर दिनांक ३० मे २०२६ पर्यंत स्विकारण्यात आलेले होते. महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांच्या निर्देशानुसार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अर्जाच्या तपासणीसाठी अंतिम मुदत वाढविण्यात आली आहे.

स्वाधार योजनेच्या अर्जामध्ये विविध त्रुटी आढळून आल्याने तसेच विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या मागण्यांचा विचार करून अर्ज तपासणी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी दि. १ जुलै ते ७ जुलै २०२६ या कालावधीत विद्यार्थ्यांना अर्जातील त्रुटींची पूर्तता करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. आतापर्यंत ऑनलाईन पोर्टलवर ज्या विदयार्थ्यांना २११विदयार्थ्यांना सेंट बैंक करण्यात आले आहे अशा विदयार्थ्यांनी त्रुटीचे कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करावयाचे आहेत. या कालावधीत विद्यार्थ्यांनी आपल्या अर्जाची स्थिती तपासून आवश्यक कागदपत्रे व माहितीची पूर्तता करावी. संबंधित तालुका समन्वयक, समतादूत तसेच महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना याबाबत आवश्यक मार्गदर्शन करावे. मुदत संपल्यानंतर अर्जातील त्रुटी दुरुस्त करण्याची सुविधा उपलब्ध राहणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली असल्याने मागील शैक्षणिक वर्षातील २१० विदयार्थ्यांनी त्रुटीची प्रक्रिया प्राधान्याने पूर्ण करावी, असे आवाहन डॉ. अनिता राठोड, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जालना यांनी केले आहे. केंद्र शासनाच्या महिला व बालविकास विभागामार्फत प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार दिला जातो. प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२६ ज्या मुलांनी (वय ५ पेक्षा अधिक व १८ वर्षापर्यंतच्या) शिक्षण, कला, सांस्कृतिक कार्य, खेळ नाविन्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य व शौर्य अशा क्षेत्रात विशेष नैपुण्यपूर्ण कामगिरी केलेली आहे, त्यांना हा पुरस्कार दिला जातो. प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२६ करिता केंद्र शासनाने अर्ज मागविले आहेत. सदरचे अर्ज (://..) या संकेतस्थळामार्फत ऑनलाईन पध्दतीने दि. ३१ जुलै २०२६ रोजी पर्यंत स्वीकारले जाणार आहेत. ज्या मुलांचे वय ५ पेक्षा अधिक व ३१ जुलै, २०२६ रोजी १८ वर्षांपेक्षा कमी आहे व ज्या मुलांनी कला, सांस्कृतिक कार्य, खेळ नाविन्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य व शौर्य, अशा क्षेत्रात विशेष नैपुण्यपूर्ण कामगिरी केलेली आहे त्यांचे प्रस्ताव वरील संकेतस्थळावर स्वतः मुले किंवा त्यांचे वतीने राज्य सरकार, केंद्रशासित प्रदेश, जिल्हाधिकारी/जिल्हादंडाधिकारी, पंचायत राज्य संस्था, नागरी स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था इ. अर्ज करु शकतात. राज्यातील अशा प्रकारच्या जास्तीत जास्त मुलांचे प्रस्ताव सादर करण्यासाठी आवाहन सहायक आयुक्त समाजकलयाण डॉ अनिता राठोड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

राज्यातील लाखो शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा देणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ ला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीक कर्जमुक्तीबरोबरच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्याचीही तरतूद या योजनेत करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, जमीन धारणेचा कोणताही निकष लागू नसल्याने अधिकाधिक शेतकरी या योजनेचा लाभ घेऊ शकणार आहेत.

योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये... तीन घटकांवर आधारित योजना- दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्ती, एकवेळ समझोता ( - ),- नियमित कर्जफेड करणाऱ्यांसाठी प्रोत्साहनपर लाभ

कोणाला मिळणार दोन लाखांपर्यंत कर्जमुक्ती?

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचा समावेश.

३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत न फेडलेले कर्ज पात्र. मुद्दल व व्याजासह दोन लाख रुपयांपर्यंतची संपूर्ण थकबाकी माफ.

एका किंवा अनेक बँकांमधील एकत्रित थकबाकीचा विचार केला जाणार.

दोन लाखांपेक्षा जास्त कर्ज असल्यास... दोन लाख रुपयांवरील रक्कम शेतकऱ्यांनी स्वतः भरावी.त्यानंतर दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ मिळेल. ही रक्कम भरण्यास ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत. नियमित कर्जफेड करणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी-- २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत वेळेवर कर्जफेड केल्यास पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ.

पूर्वीच्या कर्जमुक्ती योजनेतील लाभार्थ्यांनाही संधी

- महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ चा लाभ घेतल्यानंतर घेतलेल्या कर्जाची ५० हजार रुपयांपर्यंत थकबाकी असल्यास नव्या योजनेत लाभ मिळू शकतो.

कोण राहणार अपात्र?

लोकप्रतिनिधी व राजकीय पदाधिकारी,सरकारी कर्मचारी,आयकर भरणारे व्यक्ती,सहकारी संस्थांतील २५ हजार रुपयांपेक्षा अधिक वेतन घेणारे अधिकारी व कर्मचारी कोणत्या बँकांचा समावेश? राष्ट्रीयकृत बँका,खाजगी बँका,प्रादेशिक ग्रामीण बँका,जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका,प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था आधार प्रमाणीकरण व ॲग्रीस्टॅक नोंदणी आवश्यक लाभासाठी आधार प्रमाणीकरण बंधनकारक.ॲग्रीस्टॅक मंचावर नोंदणी आवश्यक.यासाठी स्वतंत्र ऑनलाइन पोर्टल विकसित करण्यात येणार आहे. संकलनः जिल्हा माहिती कार्यालय, जालना

# इस्टिमेट प्रमाणे रस्त्याची कामे पूर्ण करणार - चे लेखी आश्वासन!

## दि. ०१/०७/२०२६ चे आमरण उपोषण तात्पुरते स्थगित –बोरशे गुरुजी

**दत्ता देशमुख)**



भोकरदन तालुक्यातील करजगाव ते कल्याणी कुकडी फाटा व जळगाव सपकाळ ते सुरंगळी या दोन रस्त्यांची कामे निकृष्ट व अर्धवट असल्याच्या विरोधात सामाजिक कार्यकर्ते कडुबा विनायकराव बोरशे उर्फ बोरशे गुरुजी यांनी दि. ०१/०७/२०२६ रोजी ग्रामपंचायत कार्यालय करजगाव येथे आमरण उपोषणाची पूर्वसूचना दिली होती.या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भोकरदन यांनी जा.क्र. ४२६ दि. २९/०६/२०२६ रोजीचे लेखी पत्र देऊन, उर्वरित कामे तात्काळ पूर्ण करण्यात येतील, साईड शोल्डरची कामे शासकीय मानकाप्रमाणे पूर्ण करून घेण्यात येतील व रस्त्यावर माहिती फलक लावण्यात येईल, असे लेखी

आश्वासन दिले आहे.

प्रशासनावरील विश्वास व जनतेच्या हिताचा विचार करून, बोरशे गुरुजी यांनी दि. ०१/०७/२०२६ रोजीचे नियोजित आमरण उपोषण तात्पुरते स्थगित केल्याचे जाहीर केले आहे. यावेळी बोलताना बोरशे गुरुजी म्हणाले की, दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कामाची प्रत्यक्ष प्रगती व दर्जा यावर आमचे कडक लक्ष राहील. मुदतीत कामे पूर्ण व दर्जेदार न झाल्यास, आम्हाला पुन्हा तीव्र आंदोलन करण्याशिवाय पर्याय राहणार नाही.जनतेच्या एकजुटीचा व कायद्याच्या मार्गाचा हा विजय असल्याचे त्यांनी सांगितले.

# नागपुरातील दूषित पाणी प्रकरणी चौकशी करून कारवाई करण्यात येणार – मंत्री उदय सामंत

**मुंबई - प्रतिनिधी**

नागपूर शहरातील काही भागांमध्ये झालेल्या दूषित पाणी पुरवठ्याबाबत चौकशी करून दोषींवर नियमानुसार आवश्यक ती कारवाई केली जाईल, असे मंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. याबाबत सदस्य भाई जगताप यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य परिणय फुके यांनी उपप्रश्न उपस्थित केला.

मंत्री उदय सामंत म्हणाले, पाणी गुणवत्ता तपासणी, पाईपलाईन दुरुस्ती, जलशुद्धीकरण व्यवस्था आणि वितरण प्रणालीतील त्रुटी दूर करण्यासाठी प्रशासनाला आवश्यक निर्देश देण्यात येतील. तसेच पर्यावरण विभागालाही दूषित पाणी पुरवठ्यामुळे होणाऱ्या परिणामांची तपासणी करून आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या जातील. संबंधित कंपनीने करारातील अटींची पूर्तता केली आहे का, याची सखोल पडताळणी केली जाईल. अटींचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास कंपनीविरुद्ध कराराचा पुनर्विचार किंवा आवश्यक ती कारवाई करण्याबाबत निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रश्नावर नागपूर शहरातील आमदारांची समिती स्थापन करून सविस्तर अभ्यास केला जाईल. नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित पाणीपुरवठा मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क असून, कोणत्याही रहिवाशावर अन्याय होणार नाही याची शासन पूर्ण काळजी घेईल, असे मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

# प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी ३१ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या महिला व बालविकास विभागामार्फत प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार दिला जातो. प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२६ ज्या मुलांनी (वय ५ पेक्षा अधिक व १८ वर्षापर्यंतच्या) शिक्षण, कला, सांस्कृतिक कार्य, खेळ नाविन्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य व शौर्य अशा क्षेत्रात विशेष नैपुण्यपूर्ण कामगिरी केलेली आहे, त्यांना हा पुरस्कार दिला जातो. प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२६ करिता केंद्र शासनाने अर्ज मागविले आहेत. अर्ज (://..) या संकेतस्थळामार्फत ऑनलाईन पध्दतीने दिनांक ३१ जुलै २०२६ रोजी पर्यंत स्वीकारले जाणार आहेत. ज्या मुलांचे वय ५ पेक्षा अधिक व ३१ जुलै, २०२६ रोजी १८ वर्षांपेक्षा कमी आहे व ज्या मुलांनी कला, सांस्कृतिक कार्य, खेळ नाविन्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य व शौर्य, अशा क्षेत्रात विशेष नैपुण्यपूर्ण कामगिरी केलेली आहे त्यांचे प्रस्ताव वरील संकेतस्थळावर स्वतः मुले किंवा त्यांचे वतीने राज्य सरकार, केंद्रशासित प्रदेश, जिल्हाधिकारी/जिल्हादंडाधिकारी, पंचायत राज्य संस्था, नागरी स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था इ. अर्ज करु शकतात. राज्यातील अशा प्रकारच्या जास्तीत जास्त मुलांचे प्रस्ताव सादर करण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे.

# अमृतची हरित ऊर्जा क्षेत्राकडे वाटचाल अमृत ईव्ही चार्जिंग स्टेशन

**जालना - प्रतिनिधी**

हरित ऊर्जा, स्वच्छ पर्यावरण आणि शाश्वत विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेमार्फत राज्यभर अमृत ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसाय प्रोत्साहन उपक्रम राबविण्यात येत आहे. देशात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वेगाने वाढत असून आगामी काळात ईव्ही चार्जिंग स्टेशनचे व्यापक जाळे उभारण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर युवक, महिला उद्योजक, स्वयं सहाय्यता गट, एमएसएमई घटक तसेच इच्छुक उद्योजकांना ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसाय उभारण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन, व्यवसाय सल्ला तसेच पात्र लाभार्थ्यांना अमृतच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभ उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या उपक्रमांतर्गत ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारणी, संचालन व व्यवस्थापन, चार्जिंग उपकरणांची देखभाल, सौरऊर्जेवर आधारित चार्जिंग सुविधा, ग्रीन एनर्जी सेवा, ईव्ही तांत्रिक सेवा, फ्रँचायझी मॉडेल तसेच ग्रामीण भागात चार्जिंग हब उभारणी यांसारख्या क्षेत्रांमध्ये स्वयंरोजगार व रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होणार आहेत. सहभागी लाभार्थ्यांना ईव्ही क्षेत्राविषयी मूलभूत ते प्रगत प्रशिक्षण, व्यवसाय नियोजन, प्रकल्प अहवाल तयार करणे, तांत्रिक मार्गदर्शन, बाजारपेठेचा अभ्यास, व्यवसाय व्यवस्थापन तसेच संबंधित शासन योजनांची माहिती दिली जाणार आहे. या क्षेत्रातील भारतीय स्वदेशी कंपन्या व तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या इच्छुकांनी .. या अधिकृत संकेतस्थळावरील योजना विभागातील या पर्यायातून ऑनलाइन अर्ज करावा. अमृतच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभ घेण्यासाठी संस्थेच्या लक्षित गटासाठी लागू असलेल्या पात्रता व अटी लागू राहतील. अधिक माहितीसाठी अमृत जिल्हा कार्यालय, दुसरा मजला, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे किंवा मो. ७३९१०६५४७४ वर संपर्क साधावा. तसेच अमृतच्या अधिकृत संकेतस्थळावर राज्यातील सर्व जिल्हा व्यवस्थापकांचे संपर्क तपशील उपलब्ध आहेत. हरित ऊर्जा वापराला चालना देणे, पर्यावरण संरक्षणाला बळकटी देणे आणि युवक, महिला तसेच ग्रामीण उद्योजकांसाठी रोजगार व स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश असून जास्तीत जास्त इच्छुकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमृत संस्थेकडून करण्यात आले आहे.

# विधानपरिषद प्रश्नोत्तरे : माणगाव तालुका क्रीडा संकुल वर्षभरात पूर्ण होणार – मंत्री आदिती तटकरे

**मुंबई - प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुका क्रीडा संकुलाचे काम वर्षभराच्या आत पूर्ण करण्यात येणार असून, माणगाव येथे अत्याधुनिक सुविधा असलेले उप-विभागीय क्रीडा संकुल उभारण्यासाठी स्वतंत्र प्रस्ताव तयार करण्यात येईल, अशी माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

याबाबत सदस्य प्रविण दरेकर यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य अनिकेत तटकरे, भाई जगताप यांनी उपप्रश्न उपस्थित केले.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या, माणगाव हे रायगड जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाण असून, २०२० च्या चक्रीवादळात तालुका क्रीडा संकुलाचे नुकसान झाले होते. त्यानंतर विभागीय क्रीडा संकुलासाठी २४ एकर जागा क्रीडा विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली असून, ८५ कोटी रुपयांचा प्रस्तावही शासनाकडे पाठविण्यात आला होता. मात्र, खारघर येथे विभागीय क्रीडा संकुलाच्या प्रस्तावामुळे हा विषय प्रलंबित राहिला. या कालावधीत माणगाव तालुका क्रीडा संकुलासाठी ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, त्यापैकी २ कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले आहे. या कामाला गती देण्यासाठी लवकरच स्वतंत्र बैठक घेऊन काम तातडीने सुरू करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

खारघर येथे विभागीय क्रीडा संकुल उभारले जात असले तरी माणगावमध्ये विशेष बाब म्हणून उप-विभागीय क्रीडा संकुल उभारण्याचा प्रस्ताव तयार करण्यात येईल. या संकुलात स्विमिंग पूल, क्रिकेटसह विविध क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याचा शासनाचा मानस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

माणगाव विभागीय क्रीडा संकुलासंदर्भात उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार धोरणात्मक निर्णय घेतला जाईल. डोंगरी भागातील क्रीडा संकुलांच्या विकासासाठी विशेष धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल. तसेच रत्नागिरीतील क्रीडा संकुलासाठी अतिरिक्त निधीच्या प्रस्तावाचा विचार करून आवश्यक तरतूद करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे मंत्री आदिती तटकरे यांनी यावेळी सांगितले.

# हरितक्रांतीचे प्रणेते, आधुनिक महाराष्ट्राच्या कृषी विकासाचे शिल्पकार- स्व. वसंतराव नाईक

१ जुलै हा दिवस महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानाचा आणि प्रेरणादायी आहे. याच दिवशी, १ जुलै १९१३ रोजी यवतमाळ जिल्ह्यातील गहूली या छोट्याशा गावात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, हरितक्रांतीचे प्रणेते आणि शेतकऱ्यांचे खरे कैवारी स्वर्गीय वसंतराव फुलसिंग नाईक यांचा जन्म झाला. त्यांच्या स्मरणार्थ महाराष्ट्र शासनाने हा दिवस ''कृषी दिन'' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. आज त्यांची ११३ वी जयंती साजरी करताना त्यांच्या कार्याचा गौरव करणे म्हणजे महाराष्ट्राच्या कृषी विकासाचा इतिहास उजळून पाहण्यासारखे आहे. वसंतराव नाईक हे केवळ राजकारणी नव्हते, तर ते मातीतून उभे राहिलेले, शेतीच्या प्रत्येक प्रश्नाची जाणीव असलेले आणि शेतकऱ्यांच्या दुःखाशी नाळ जुळलेले दूरदृष्टीचे नेते होते. त्यांनी जवळपास बारा वर्षे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळली. राज्याच्या इतिहासातील सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहण्याचा मान त्यांना मिळाला. त्यांच्या कार्यकाळात शेती, ग्रामीण विकास, सिंचन, रोजगार, शिक्षण आणि सहकार या क्षेत्रांत भरीव बदल घडून आले. १९६० च्या दशकात महाराष्ट्रासह देश अन्नधान्याच्या टंचाईचा सामना करत होता. पावसावर अवलंबून असलेली शेती, कमी उत्पादन, पारंपरिक पद्धती आणि अपुरी सिंचन व्यवस्था यामुळे शेतकरी संकटात होता. अशा कठीण परिस्थितीत वसंतराव नाईक यांनी आधुनिक शेतीचा मार्ग स्वीकारण्याचे धाडस दाखवले. सुधारित बियाणे, रासायनिक खते, कीड नियंत्रण, आधुनिक अवजारे आणि वैज्ञानिक शेती यांचा पुरस्कार करून त्यांनी उत्पादनवाढीची चळवळ उभी केली. याच धोरणांमुळे महाराष्ट्रात हरितक्रांतीची मजबूत पायाभरणी झाली. त्यांनी सिंचन विकासाला विशेष प्राधान्य दिले. लघु व मध्यम सिंचन प्रकल्प, विहिरी, शेततळी, जलसंधारण आणि पाण्याचा कार्यक्षम वापर यावर त्यांनी भर दिला. ''पाणी अडवा, पाणी जिरवा'' या विचारांचा पाया त्यांच्या धोरणांत दिसून येतो. शेतीचे भविष्य पाण्यावर अवलंबून आहे, ही त्यांची दूरदृष्टी आजही तितकीच महत्त्वाची आहे. वसंतराव नाईक यांनी कृषी विद्यापीठांच्या स्थापनेला प्रोत्साहन दिले. संशोधन, शिक्षण आणि विस्तार यांचा मजबूत दुवा निर्माण करून संशोधन थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावे, यासाठी त्यांनी प्रयत्न केले.



कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार, शेतकरी प्रशिक्षण, सुधारित शेती पद्धती आणि पीक विविधीकरण या संकल्पना त्यांनी प्रभावीपणे पुढे नेल्या. त्यांच्या कार्यकाळात कापूस, ज्वारी, तूर, सोयाबीन, ऊस, फळबागा आणि इतर नगदी पिकांना चालना मिळाली. कोरडवाहू शेतीसाठी संशोधन, योग्य पिकपद्धती आणि जलव्यवस्थापन यावर त्यांनी विशेष भर दिला. विदर्भ, मराठवाडा आणि इतर दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे त्यांनी संवेदनशीलतेने पाहिले. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास हा त्यांच्या धोरणांचा केंद्रबिंदू होता. ग्रामीण रस्ते, शिक्षण, सहकारी संस्था, दुग्धव्यवसाय, पशुसंवर्धन, रोजगार निर्मिती आणि ग्रामविकास यांना त्यांनी चालना दिली. शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावल्याशिवाय राज्याचा विकास शक्य नाही, हा त्यांचा ठाम विश्वास होता. आज हवामान बदल, पाण्याची कमतरता, उत्पादन खर्चात वाढ, बाजारपेठेतील अनिश्चितता आणि शेतीतील वाढते धोके या नव्या आव्हानांसमोर आपण उभे आहोत. अशा काळात वसंतराव नाईक यांची दूरदृष्टी अधिक महत्त्वाची वाटते. वैज्ञानिक शेती, जलसंधारण, पीक विविधीकरण, सामूहिक शेती, मूल्यवर्धन, प्रक्रिया उद्योग आणि शेतकरी संघटन शक्तीची उभारणी हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. ॲग्रोव्हिजन गटशेती संघ ही ''शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांची, शेतकऱ्यांसाठी स्वयंप्रेरणेने चालविलेली संपूर्ण शेती चळवळ'' आहे. शिक्षण, संशोधन आणि विस्तार या त्रिसूत्रीवर आधारित आमची वाटचाल वसंतराव नाईक यांच्या विचारांशी सुसंगत आहे. आधुनिक तंत्रज्ञान, ज्ञानाची देवाणघेवाण, सामूहिक कृती आणि शाश्वत शेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सक्षम करण्याचा आमचा प्रयत्न त्यांच्या कार्यातूनच प्रेरणा घेत पुढे जात आहे. आज कृषी दिनाच्या निमित्ताने आपण एक संकल्प करूयाशेतीला विज्ञानाची जोड देऊ, पाण्याचा प्रत्येक थेंब जपू, मातीचे आरोग्य सांभाळू, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करू, सामूहिकतेची ताकद वाढवू आणि पुढील पिढीसाठी समृद्ध, शाश्वत आणि आत्मनिर्भर शेती उभी करू. 'शेतकरी समृद्ध तर देश समृद्ध.''हीच वसंतराव नाईक यांच्या कार्याला खरी मानवंदना ठरेल.अशा या हरितक्रांतीचे जनक, शेतकऱ्यांचे हितचिंतक आणि आधुनिक महाराष्ट्राच्या कृषी विकासाचे शिल्पकार स्व. वसंतराव नाईक यांना त्यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

जय जवान जय किसान- जय विज्ञान !कृषी दिनानिमित्त सर्व शेतकरी बांधवांना हार्दिक शुभेच्छा!

**-संजय मोरे पाटील संस्थापक प्रमुख,**
**ॲग्रोव्हिजन गटशेती संघ. रा.**
**नळविहिरा, ता. जाफराबाद जि. जालना**

# गोमाता संवाद यात्रेचे दुचाकी रॅली, पुष्पवृष्टीने उत्साही स्वागत!

## गोशाळांनी व्यावसायिक होण्याचा संकल्प करावा :शेखर मुंदडा

**जालना - प्रतिनिधी**

पशुसंवर्धन विभाग आणि महाराष्ट्र गोसेवा आयोगातर्फे गोआधारित शेतीचा प्रचार -प्रसार, देशी गोवंशाचे संवर्धन याबाबत जनजागृती साठी निघालेल्या राज्यमाता ,गोमाता संवाद यात्रेचे मंगळवारी (ता. ३०) जालना शहरात उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. ''जनम- जनम का नाता है ,गौ हमारी माता है.., भारत माता की जय.., गौमाता की जय...!'' अशा गगनभेदी घोषणांनी संपूर्ण शहर दणाणून गेले.

तथापि गोखत, गोग्रास, गौ गणपती अशा उपक्रमांतून गोशाळा व्यावसायिक दृष्टीने चालवण्याचा संकल्प करा असे मत महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी व्यक्त केले. महाराष्ट्रात गोहत्या बंदी कायदा अधिक कठोर केला असून अनधिकृत कत्तलखाने बंद करण्यात आले आहेत.




गोरक्षण करणाऱ्या सेवकांना सीएसआर आणि दानशूर यांच्या मदतीने विम्याचे कवच दिले जाणार असून गोरक्षकांनी कायदा हाती घेऊ नये असे आवाहनही त्यांनी केले.

अंबड चौफुली येथे सकाळी यात्रेचे आगमन होताच पांजरापोळ गोशाळेचे अध्यक्ष घनश्यामदास गोयल, ओमप्रकाश मंत्री, बनारसीदास जिंदल, विजय कामड, शिवरतन मुंदडा, कैलास बियाणी, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. प्रशांत चौधरी, सहाय्यक आयुक्त रमेश पाटील, सुनील खोडके, जालिंदर ढिल्पे,

विठ्ठलराव खैरे, आदींनी यात्रेचे स्वागत केले.अंबड चौफुली येथून दुचाकी रॅली काढण्यात आली. सुभाष चौक येथे टाळ- मृदुंगाच्या गजरात वारकरी देखील यात्रेत सहभागी झाले. ठिक-ठिकाणी रांगोळी, पुष्पवृष्टी करत जालनेकरांकडून उत्साह पूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. गोकुळ लॉन्स येथे झालेल्या गोशाळा विश्वस्तांच्या संवाद मेळाव्यास ह.भ.प. डॉ. भगवान महाराज आनंदगडकर, खा.डॉ. कल्याण काळे, महापौर वंदनाताई मगरे ,उपमहापौर राजेश राऊत, पाणीपुरवठा सभापती पूनम स्वामी, दुर्गेश काठोठीवाले, महाराष्ट्र गोसेवा संघाचे अध्यक्ष डॉ.सुनील सुर्यवंशी, उद्धव नेरकर, विजय कामड,सुदेश सकलेचा ,अन्नपूर्णा कांबळे ,विष्णू महाराज ,रोहिणी भंडारी, प्रभाकर शास्त्री, सुभाषचंद्र देवीदान, नरेंद्र मोदी, विजय राठी, महेंद्र भक्कड, बंकटलाल खंडेलवाल, अरुण मोहता, सिध्दीविनायक मुळे, प्रा.सत्संग मुंढे, सुनील खरे,पुसाराम मुंदडा, डॉ.मंगलप्रसाद शुक्ला, गणेश सुपारकर ,आदींची उपस्थिती होती.

याप्रसंगी गौसेवक व्यंकटेश भगत ,गौरव देशमाने ,मयूर जाधव, राहुल गिरी ,साईनाथ जाधव यांचा सत्कार करण्यात आला. *(पान २ वर)*

# श्री बालाजी खाजगी शिक्षक पतसंस्थेच्या उपाध्यक्षपदी प्रा.नंदकिशोर लेखनार यांची बिनविरोध निवड

**भोकरदन - प्रतिनिधी**

'श्री बालाजी खाजगी शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित' (भोकरदन-जाफराबाद) च्या उपाध्यक्षपदाची निवडणूक अत्यंत उत्साहात पार पडली असून, या पदावर प्राध्यापक श्री. नंदकिशोर लेखनार सर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

पतसंस्थेच्या कार्यालयात निवडणूक पीठासीन अधिकारी श्री. वाघमारे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही निवड प्रक्रिया पार पडली. उपाध्यक्षपदासाठी प्रा. नंदकिशोर लेखनार यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाला होता. मुदतीत दुसरा कोणताही अर्ज न आल्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी ही निवडणूक बिनविरोध झाल्याची अधिकृत घोषणा केली.



प्रा. नंदकिशोर लेखनार यांच्या निवडीबद्दल संस्थेचे समस्त सभासद बांधव, शिक्षक आणि कर्मचारी वर्गाकडून त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

या विशेष प्रसंगी पतसंस्थेचे अध्यक्ष श्री. नंदकुमार गिरे , मावळते उपाध्यक्ष श्री. डी. बी. पाटील, पतसंस्थेचे माजी अध्यक्ष प्राचार्य माणिक दानवे सर, महेंद्र लोखंडे सर, श्री. आनंदा वाघ, श्री. विकास वाघ सर, श्री. संजय तोटे सर, श्रीमती कासोद मॅडम, श्री. आर. ए. सपकाळ सर तसेच पतसंस्थेचे सचिव श्री. बळीराम मदन आदी मान्यवर आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेच्या प्रगतीमध्ये प्रा. लेखनार यांच्या अनुभवाचा मोठा फायदा होईल, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला. या नियुक्तीबद्दल माजी केंद्रीयमंत्री रावसाहेब पा. दानवे, आ. संतोष पा. दानवे, आशाताई पांडे, माणिकराव दानवे, मा. व्हा.चेअरमन संतोष कर्वे यांनी अभिनंदन केले.

# जालना शहरातील शेख हकीम शेख चाँद (लकडीवाले) यांचे निधन

## गरीबशाह कब्रस्तान मध्ये पार पडला दफनविधी



**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील मिल्लत नगर, जुना जालना येथील रहिवासी शेख हकीम शेख चाँद (लकडीवाले) यांचे सोमवारी (दि. २९ जून) रात्री ८.३० वाजता अल्प आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिसरातील नागरिकांमध्ये शोककळा पसरली असून, अनेकांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देत श्रद्धांजली अर्पण केली.

मरहूम शेख हकीम हे शेख अज़गर भाई लकडीवाले, शेख सलीम भाई (युनिक कॉम्प्युटर) आणि शेख ताहेर यांचे मोठे बंधू होते. तर पत्रकार सय्यद अफसर यांचे काका होते. त्यांच्या पश्चात पत्नी, आई, एक बहीण, तीन भाऊ, एक मुलगा व दोन मुली असा मोठा परिवार आहे.

मंगळवार, दि. ३० जून २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता मिल्लत नगर, जुना जालना येथील राहत्या घरातून त्यांची अंत्ययात्रा निघून गरीबशाह बजार कब्रस्तान येथे नमाज-ए-जनाजा अदा करून दफनविधी करण्यात आला असल्याची माहिती त्यांचे मामा शेख महेमूद भाई लकडी वाले यांनी दिली आहे.

# जनगणना २०२७ चा पहिला टप्पा संपून १५ दिवस उलटले, तरीही शिक्षक मानधन व कार्यमुक्त प्रमाणपत्रापासून वंचित!

## शेख अब्दुल रहीम यांची मनपा उपआयुक्त तथा जनगणना शहर प्रमुख अर्पणा थेटे यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रात जनगणना २०२७ चा पहिला टप्पा अत्यंत प्रभावीपणे पार पडला असला, तरी राष्ट्रीय कर्तव्य बजावणाऱ्या राष्ट्रनिर्मात्या शिक्षकांचे न्याय्य प्रश्न अद्याप प्रलंबित आहेत. हा टप्पा संपून जवळपास १५ दिवसांचा कालावधी उलटून गेला तरी, सहभागी पर्यवेक्षक आणि प्रगणक शिक्षकांना अद्याप प्रशिक्षण भत्ता, पहिल्या टप्प्याचे मानधन आणि अधिकृत कार्यमुक्त प्रमाणपत्र ( ) मिळाले नसल्याची बाब समोर आली आहे. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधत महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनचे राज्य प्रवक्ता आणि हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांनी जनगणना शहर प्रमुख तथा मनपा उपआयुक्त श्रीमती अर्पणा थेटे यांच्याकडे निवेदनाद्वारे हे प्रश्न तात्काळ मार्गी लावण्याची आग्रही मागणी केली आहे. या संदर्भात मनपा आयुक्त मा. अमोल येडगे साहेब आणि मुंबई येथील जनगणना कार्य निर्देशालयाच्या सहसंचालकांनाही माहिती व उचित कार्यवाहीसाठी पत्राची प्रतिलिपि पाठवण्यात आली आहे...*

**तीव्र उन्हात बजावले कर्तव्य; पण हक्काचा परतावा मिळेना**

उपआयुक्त तथा जनगणना शहर प्रमुख अर्पणा थेटे यांना दिलेल्या निवेदनात शेख अब्दुल रहीम यांनी नमूद केले आहे की, जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्याची सांगता गेल्या १४ जून रोजीच झालेली आहे. सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी तीव्र उन्हाची व प्रतिकूल परिस्थितीची पर्वा न करता, राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव ठेवून हे काम अत्यंत प्रामाणिकपणे व वेळेत पूर्ण केले. मात्र, काम संपून पंधरवडा उलटला, तरी प्रशासकीय पातळीवर शिक्षकांच्या मानधनाचा आणि प्रमाणपत्राचा प्रश्न प्रलंबित ठेवण्यात आल्याने शिक्षक वर्गात काहीशी नाराजी आहे...

**पत्रातील ३ प्रमुख मागण्या:**

३ दिवसांचा प्रशिक्षण भत्ता त्वरित द्या:* जनगणनेचे काम अचूक व्हावे यासाठी शिक्षकांना ३ दिवसांचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले होते. या हक्काच्या ३ दिवसांचा प्रशिक्षण भत्ता शिक्षकांना विनाविलंब अदा करावा. पहिल्या टप्प्याचे मानधन खात्यावर वर्ग करा:* १४ जून रोजी पहिला टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यामुळे, सर्व पर्यवेक्षक व प्रगणक शिक्षकांचे हक्काचे मानधन थेट त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात यावे.

*कार्यमुक्त प्रमाणपत्र ( ) तात्काळ मिळावे:* पहिला टप्पा अधिकृतपणे संपला असला, तरी शिक्षकांना अद्याप कार्यमुक्त प्रमाणपत्र मिळालेले नाही. शासकीय व शैक्षणिक कामकाजाच्या कायदेशीर नोंदींसाठी हे प्रमाणपत्र अत्यंत महत्त्वाचे असल्याने ते त्वरित उपलब्ध करून द्यावे.

प्रशासनाकडून सकारात्मक निर्णयाची अपेक्षा

''शिक्षक नेहमीच राष्ट्रीय कार्यात अग्रभागी राहून आपले कर्तव्य बजावत असतात. कामाची पूर्तता झाल्यानंतर त्यांना त्यांच्या हक्काचा परतावा आणि अधिकृत प्रमाणपत्र वेळेत मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. मनपा प्रशासनाने या सर्व बाबींचा सहानुभूतीपूर्वक व गांभीर्याने विचार करून संबंधित विभागाला तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश द्यावेत,'' अशी कळकळीची विनंती *शेख अब्दुल रहीम* यांनी सर्व शिक्षक बांधवांच्या वतीने केली आहे. आता यावर मनपा प्रशासन काय पावले उचलते, याकडे सर्व शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

# फर्स्ट क्राइला ग्राहक आयोगाचा दणका: ऑर्डर रद्द करून फसवणूक करणारा ठरवल्याबद्दल ५०,००० रुपयांची भरपाई देण्याचे आदेश

**जालना - प्रतिनिधी**

एका ग्राहकाची ऑनलाइन ऑर्डर अचानक रद्द करणे, भरलेली रक्कम परत न देणे आणि कोणताही पुरावा नसताना ग्राहकाला फसवणूक करणारा वापरकर्ता म्हणून घोषित करणे, प्रसिद्ध ई-कॉमर्स कंपनी फर्स्ट क्राइला चांगलेच महागात पडले आहे. कर्नुल जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने कंपनीला सेवेत त्रुटी आणि अनुचित व्यापार पद्धतीचा ठपका ठेवत, ग्राहकाला भरलेली रक्कम परत करण्यासोबतच ५०,००० रुपयांची नुकसान भरपाई देण्याचे निर्देश दिले आहेत.या प्रकरणात, शेख अल्ताफ नावाच्या तक्रारदाराने १ डिसेंबर २०२४ रोजी फर्स्ट क्राइ.कॉम वरून आपल्या मुलासाठी २,१३०.०६ रुपये किमतीची एक ट्रायसिकल ऑर्डर केली होती. मात्र, दुसऱ्याच दिवशी कंपनीने कोणतीही पूर्वसूचना न देता किंवा कारण न सांगता त्यांची ऑर्डर रद्द केली आणि भरलेली रक्कमही परत केली नाही. ग्राहकाने याबाबत कंपनीच्या कस्टमर केअरशी संपर्क साधला असता, २०२३ मधील एका जुन्या ऑर्डरमध्ये चुकीचे उत्पादन परत केल्याचा आरोप ठेवत, नवीन ऑर्डरची रक्कम त्या व्यवहारात समायोजित करण्यात आल्याचे सांगण्यात आले.तक्रारदाराने कंपनीचे सर्व आरोप फेटाळून लावले. त्यांनी युक्तिवाद केला की, २०२३ मधील रिटर्न कंपनीच्या नियमांनुसारच वेअरहाऊसमध्ये गुणवत्ता तपासणी झाल्यानंतर स्वीकारण्यात आला होता आणि त्यानंतरच परतावा मंजूर झाला होता. असे असताना, कोणतीही नोटीस किंवा चौकशी न करता नवीन ऑर्डर रद्द करून पैसे वसूल करणे आणि अंतर्गत प्रणालीमध्ये आपल्याला फसवणूक करणारा वापरकर्ता म्हणून चिन्हांकित करणे बेकायदेशीर असल्याचे त्यांनी आयोगासमोर मांडले.दुसरीकडे, फर्स्ट क्राइ.कॉम ने तक्रारदाराच्या दाव्यावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. कंपनीच्या मते, ऑर्डर आणि बीजक समीर बाशा बामरी यांच्या नावावर होते, त्यामुळे तक्रारदार शेख अल्ताफ यांचा या प्रकरणाशी संबंध नाही. कंपनीने असाही दावा केला की, २०२३ च्या व्यवहारात मूळ उत्पादनांऐवजी बनावट उत्पादने परत करण्यात आली होती, ज्यामुळे कंपनीचे नुकसान झाले. त्यामुळे कंपनीच्या अंतर्गत फसवणूक शोध प्रणालीने नवीन ऑर्डर रद्द करून रक्कम समायोजित केली, असे कंपनीने म्हटले.आयोगाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर *(पान २ वर)*

# रोटरी क्लब रेनबोची नूतन कार्यकारणी जाहिर

## अध्यक्षपदी मधुलता भक्कड, सचिवपदी डॉ. अतुल जिंतूरकर तर उपाध्यक्षपदी केतन शाह

**जालना - प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोची नूतन कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून, अध्यक्षपदी मधुलता भक्कड, सचिवपदी डॉ. अतुल जिंतूरकर तर कोषाध्यक्षपदी केतन शाह यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. या नवनियुक्त कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा रविवार, दि. ५ जुलै रोजी सायंकाळी ६:३० वाजता हॉटेल सॅफ्रनमध्ये अत्यंत आयोजित करण्यात आला आहे.



मधुलता भक्कड — अध्यक्ष | डॉ. अतुल जिंतूरकर — सचिव | केतन शाह — कोषाध्यक्ष

या सोहळ्याला मुख्य अतिथी वक्ते म्हणून ठाण्याचे प्रख्यात बालरोग तज्ज्ञ डॉ. लक्ष्मीकांत कासट हे उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी रोटरीचे सहाय्यक प्रांतपाल प्रतीक नानावटी हे नूतन पदाधिकाऱ्यांना पदभार सोपवतील.

याप्रसंगी रोटरी परिवारातील सदस्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मावळत्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा श्रीपत आणि मावळते सचिव पंकज लड्डा यांनी केले आहे.

# राजे संभाजी विद्यालयाच्या विद्यार्थिनीची शासकीय न्यायवैद्यक शास्त्र संस्थेत निवड

**दत्ता देशमुख**

जवखेडा ठेंग (ता. जाफराबाद) : राजे संभाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जवखेडा ठेंग येथील कु. निकिता वंदना गजानन जाधव हिची शासकीय न्यायवैद्यक शास्त्र संस्था, मुंबई (डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ) येथे निवड झाल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने तिचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत विद्यार्थिनींच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्वांनी तिचे कौतुक करत पुढील



शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, इतर विद्यार्थ्यांनाही उच्च शिक्षणासाठी प्रेरणा मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. विद्यालयाच्या या यशाबद्दल परिसरातून कु. निकिता जाधव हिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, विद्यालयाच्या शैक्षणिक विकासामध्ये मानाचा तुरा रोडला गेला आहे. राजे संभाजी विद्यालयाच्या शैक्षणिक क्षेत्रामध्ये चांगली प्रगती होत आहे. याप्रसंगी प्राचार्य ठालेसह प्राध्यापक वाघ, व इतर सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# डिजिटल इंडिया हवा, डार्क इंडिया नको; पाणी आधी जनतेला मगच डेटा सेंटरला' एल निनोच्या पार्श्वभूमीवर ॲड. महेश धन्नावत यांची भूमिका

**जालना - प्रतिनिधी**

देशात कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाऊड कॉम्प्युटिंग आणि डिजिटल अर्थव्यवस्थेचा वेग वाढत असताना, या विकासाला आधार देणारी डेटा सेंटर्स उभी राहत आहेत. महाराष्ट्रानेही 'डेटा सेंटर धोरण' जाहीर करून या क्षेत्रात आघाडी घेतली आहे. मात्र, या विकासाची किंमत सामान्य नागरिकांच्या मूलभूत गरजांच्या बदल्यात मोजली जाऊ नये, अशी स्पष्ट भूमिका जालना येथील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. महेश धन्नावत यांनी मांडली आहे.

'लोको' या संशोधन संस्थेने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालात डेटा सेंटरच्या वाढत्या वीज व पाणी वापरावर चिंता व्यक्त केली आहे. अमेरिकेसारख्या प्रगत देशातही आता 'डेटा सेंटर्स नकोत' अशी जनभावना तयार होत आहे. एका मध्यम आकाराच्या डेटा सेंटरला वर्षाला सुमारे ४५ लाख लिटर पाण्याची गरज लागते, तर गुगलसारख्या कंपनीचे डेटा सेंटर १५ लाख लोकसंख्येच्या शहराला वर्षभर पुरेल एवढे पाणी वापरते. महाराष्ट्रात सध्या ७० डेटा सेंटर्स कार्यरत असून ४८ नव्या केंद्रांचे प्रस्ताव आहेत. २०३० पर्यंत या क्षेत्राला ४.५ गिगावॅट वीज लागणार आहे, जी राज्याच्या एकूण वीज मागणीच्या सुमारे १५ टक्के आहे. या पार्श्वभूमीवर ॲड. धन्नावत यांनी म्हटले की, ''डिजिटल इंडिया ही काळाची गरज आहे, त्याला आमचा विरोध नाही. पण एल निनोच्या प्रभावामुळे यंदा राज्यात दुष्काळसदृश स्थिती निर्माण होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. अशा वेळी प्राधान्यक्रम ठरवणे गरजेचे आहे. पिण्याचे पाणी, घरगुती वापर आणि शेतीसाठी पाणी याला सर्वोच्च प्राधान्य मिळाले पाहिजे. डेटा सेंटरसाठी पाणी-वीज देताना शाश्वत स्रोतांची हमी घेतली पाहिजे, अन्यथा डिजिटल इंडियाच्या नावाखाली 'डार्क इंडिया' होण्याचा धोका आहे.''

ॲड. धन्नावत यांच्या सूचना , पाणी वापराचे धोरण : राज्य सरकारने डेटा सेंटरसाठी 'झिरो लिक्विड डिस्चार्ज' आणि पाण्याचा पुनर्वापर बंधनकारक करावा. नव्या केंद्रांना परवानगी देताना स्थानिक पाणी उपलब्धतेचा स्वतंत्र ऑडिट अहवाल मागवावा. ऊर्जा नियोजन: डेटा सेंटरनी किमान ५० टक्के वीज नवीकरणीय स्रोतांमधून घेणे बंधनकारक करावे, जेणेकरून सामान्य ग्राहकांवरील वीजदराचा बोजा वाढणार नाही.सण-उत्सवात जलसाक्षरता: पाण्याचे दुर्भिक्ष लक्षात घेता, यंदाच्या गणेशोत्सवात नागरिकांनी स्वेच्छेने मूर्तींचा आकार मर्यादित ठेवावा. यामुळे विसर्जनासाठी लागणारे पाणी वाचेल व जलप्रदूषणही कमी होईल.पारदर्शकता व न्यायप्रवेश: माहिती अधिकार नियम, २०२६ मधील वकिलांना सुनावणीला बंदी घालणारी तरतूद रद्द करावी. बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाच्या निवडून आलेल्या सदस्यांनी यात लक्ष घालून वकिलांचा *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.